**सं.फौ.ख.क्र.८९५/२०२२**
**सरकार वि..मोरेशवर**
**नि.क्र.१४ च्या खाली**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राहूल भिमराव बावणे.
वय ३३ वर्ष, व्यवसाय– रोजमजुरी.
राह.सिर्सी, तह.उमरेड जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा करण्यासाठी समन्स पत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्र.१७** देण्यात आला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१८** देण्यात आले. आला मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०९/२०२२ रोजी माझ्या समक्ष मौजा सिर्सी येथे आरोपीची अंग झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन देशी दारूच्या १८० मिलीच्या १४ निपा मिळून आल्या व त्याबाबतचा घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला मला वाचून दाखविला व त्यानंतर त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सह्या केल्या. आता मला माझ्या बयानातील **अधोरेखांकित भाग अ** वाचून दाखविला तो बरोबर नाही. पोलिसांनी माझे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. श्रीमती एस.जी.रामटेके यांनी उलटतपास नाकारला.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१७/०९/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,उमरेड